१

## ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : २०/०१/२०१५

**मा.सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक २९, दिनांक २०/०१/२०१५**
**सभा सूचना क्रमांक ०९, दिनांक ०८/०१/२०१५**
**सभा क्रमांक ०१, दिनांक २०/०१/२०१५**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २०/०१/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.३० वा. ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ०९, दिनांक ०८/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

**सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.**

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आरज प्रगती भारत | ४ | नरेश रतन मणेरा |
| ५ | मढवी बिंदू महेंद्र | ६ | डुंबरे मनोहर जयसिंग |
| ७ | मुकेश मधुकर मोकाशी | ८ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ९ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | १० | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ११ | स्नेहा अंकुश पाटील | १२ | मधुकर रामचंद्र पावशे |
| १३ | उषा संजय भोईर | १४ | भोईर संजय देवराम |
| १५ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १६ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| १७ | चव्हाण तेजस्विनी किरण | १८ | चव्हाण सुधाकर वामन |
| १९ | वाव्हळ सुभाष सिताराम | २० | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| २१ | संभाजी धोंडिराम पंडीत | २२ | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| २३ | विलास चंदू कांबळे | २४ | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २५ | राधा फत्तेबहादूर सिंह | २६ | सरैय्या अमित जयसिंग |
| २७ | जगदाळे हनुमंत ज्ञानु | २८ | जाधवर राधाबाई सुभाष |
| २९ | पालांडे दशरथ बाबुराव | ३० | पाटील वर्षा वसंत |
| ३१ | सरनाईक विहंग प्रताप | ३२ | सरनाईक परिषा प्रताप |
| ३३ | पाटील शारदा विजय | ३४ | भोईर विमल अर्जून |
| ३५ | चव्हाण विक्रांत भिमसेन | ३६ | गौरी अनिता सुनील |
| ३७ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३८ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ३९ | लासे विजया मनोज | ४० | महेश्वरी संजय तरे |
| ४१ | पाटील उमेश काशिनाथ | ४२ | एगडे रामचंद्र हरी |
| ४३ | देसाई सुहास सुर्यकांत | ४४ | नंदिनी राजन विचारे |
| ४५ | मिलिंद माधव पाटणकर | ४६ | वडवले संतोष वसंत |
| ४७ | मंदार प्रमोद विचारे | ४८ | वैती अशोक बारकू |
| ४९ | कणसे निर्मला शरद | ५० | तायडे रामभाऊ महादेव |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

५१ बोरीटकर प्रभा अशोक
५२ आशा बाबासाहेब कांबळे
५३ भोईर एकता एकनाथ
५४ शान मनप्रीत गुरमकसिंग
५५ जितेंद्र प्रभाकर वाघ
५६ संगिता माणिक पाटील
५७ शिंदे मनोज़ तुकाराम
५८ घाडीगांवकर संजय पांडुरंग
५९ काशिराम गोविंद राऊत
६० खताळ विशाखा मधुकर
६१ मोरे संध्या सुनिल
६२ जगताप अश्विनी अशोक
६३ जानकर योगेश तातोबा
६४ संखे मिनल मुकूंद
६५ वेतकर दिपक विजय
६६ म्हस्के नरेश गणपत
६७ भोसले नम्रता दिपक
६८ पाटील सुजाता भास्कर
६९ हिरांकात बेंडू फर्डे
७० नारायण शंकर पवार
७१ मोरे रुचिता राजेश
७२ कोकाटे सुधीर विष्णु
७३ सोनार सारिका संजय
७४ वाघ पुजा गणेश
७५ महेश सुरेश वाघ
७६ वहिदा मुस्तफा खान
७७ नजीब सुलेमान मुल्ला
७८ मनिषा महेश साळवी
७९ महेश जगन्नाथ साळवी
८० पाटील मिलींद भारत
८१ पाटील मनाली मिलींद
८२ केणी मुकूंद बाळू
८३ केणी प्रमिला मुकूंद
८४ महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट
८५ हंडोरे मेघना सुनिल
८६ संजय संतू वाघुले
८७ लोखंडे सुहासिनी सुनिल
८८ भरत अभिमन्यु चव्हाण
८९ अनिता अरुण बिर्जे
९० टिकमानी लक्ष्मण (लच्छू)
८१ पाटील मालती रमाकांत
९२ राजे गिरीश अनंत
९३ रेखा भालचंद्र पाटील
९४ पाटील अवंतिका शशिकांत
९५ नाईक राजश्री सुनिल
९६ यादव रिटा राजनाथ
९७ राजेश भालचंद्र गवारी
९८ काकडे बालाजी दगडू
९९ ठाकूर अक्षय अनंत
१०० कुरेशी यासीन अय्युब
१०१ कळंबे मंगल चंद्रकांत
१०२ विश्वनाथ भगत
१०३ कुरेशी साजिया आई
१०४ पाटील रेश्मा रमेश
१०५ असिया यासिन कुरेशी
१०६ पठाण अशरफ उस्तान
१०७ गोटे सिंधू कुंदन
१०८ हफिजा नसीरुद्दीन नाईक
१०९ किणे राजन नारायण
११० हिरा सिताराम पाटील
१११ मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग
११२ मुंडे सुनिता गणेश
११३ आशरीन इब्राहीम राऊत
११४ अन्सारी साजिया परवीन सरफराज
११५ पाटील शैलेश मनोहर

**<u>गैरहजर सन्मा.सदस्य खालीलप्रमाणे :--</u>**

१. राजकुमार रामनयन यादव
२. पांडे संजय श्रीनाथ
३. डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर
४. नंदा कृष्णा पाटील

महापौर
महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | साळवी अपर्णा मिलींद | ६. | साळवी मनोहर रामा |
| ७. | सामंत विलास शिवराम | ८. | भगत सुधीर रामचंद्र |
| ९. | खान मिराज नईम | १० | डोंगरे सिराज महम्मद अली |

( छत्रपती.शिवाजी महाराज यांच्या पुतळयास मा.महापौर सो. पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतात.)

तद्नंतर राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते.

( मा.सचिव सभेची विषयपत्रिका वाचून सभेला सुरुवात करतात. )

**मा.सचिव :-**

महापौर महोदय, सर्वप्रथम ठाणे महापालिकेचे नविन आयुक्त मा.श्री.जैयस्वाल यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात येत आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

महापौर महोदय त्याचप्रमाणे नवनिर्वाचित सदस्य यांचासुध्दा सभागृहाच्यावतीने सत्कार करण्यात यावा.

**श्री.हरिश्चंद्र पाटील :-**

महापौर महोदय, नविन आयुक्त साहेबांनी यापुर्वी कोठेकोठे काम केले आहे याबाबतसुध्दा परिचय देताना सांगावे.

**मा.सचिव :-**

प्रभाग क्र.१३-अ च्या नगसेविका श्रीमती कांचन चिंदरकर, प्रभाग क्र.३४-अ च्या नगरसेविका जयश्री रविंद्र फाटक, ३४-ब चे नगरसेवक श्री.रविंद्र सदानंद फाटक, प्रभाग क्र.६१-अ चे नगरसेवक श्री.अन्सारी साजिद महंमद युसुफ तसेच प्रभाग क्र.६३-अ च्या नगरसेविका श्रीमती शेख हसीना अब्दुल यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात येत आहे.

( नविन सदस्यांचा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात येतो. )

**मा.सचिव :-**

महापौर महोदय, ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी सौ.नीना प्रमोद गोळे या राष्ट्रीय खेळाडु असुन त्यांची महाराष्ट्र राज्य महिला संघाच्या व्यवस्थापकपदी नेमणुक झाली आहे व त्याची बंगलोर, कनार्टक येथे दि.७ ते ११ जानेवारी २०१५ या कालावाधीत संपन्न झालेल्या ४८ व्या राष्ट्रीय अजिंक्य स्पर्धेत महाराष्ट्र राज्य महिला संघाच्या व्यवस्थापक म्हणून मोलाची कामगिरी केली व या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महिला संघाने अंतिम विजेतेपद संपादन केलेले आहे. तरी त्यांचासुध्दा सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात येत आहे. सदर अभिनंदन ठरावाचे सूचक सन्मा.सदस्य श्री.अशोक वैती आहेत व अनुमोदक सन्मा.सदस्य श्री.सुहास देसाई आहेत.

**श्री.संतोष वडवले :-**

महापौर महोदय, याठिकाणी ठाणे महापालिकेच्या कर्मचारी सौ.नीना प्रमोद गोळे हयांचा जो अभिनंदनाचा ठराव वाचण्यात आला आहे. श्रीमती गोळे यांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे व त्यामुळे त्यांची निवड करण्यात आलेली आहे. तरी महापालिकेकडून त्यांना एक वेतनवाढ देण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे.

ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री.दशरथ पालांडे :-**

महापौर महोदय, सन्मा.गटनेते श्री.संतोष वडवले यांनी चांगली सूचना केली आहे. तरी श्रीमती गोळे हयांना एक वेतनवाढ देण्यात यावी व त्यांचा गौरव करण्यात यावा या सूचनेस मी अनुमोदन देत आहे.

**मा.महापौर सो. :-**

ठिक आहे.

( श्रीमती नीना प्रमोद गोळे यांचा सभागृहाच्यावतीने सत्कार करण्यात येतो. )

**मा.सचिव :-**

त्याचप्रमाणे ठाणे महापालिकेचक माजी विरोधी पक्षनेते सन्मा.श्री.नजिब मुल्ला यांचा वाढदिवस आहे तरी त्यांचासुध्दा सभागृहाच्यावतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

( सन्मा.सदस्य श्री.नजिब मुल्ला यांच्या वाढदिवसानिमित्त सभागृहाच्यावतीने अभिनंदन करण्यात येते.)

**मा.सचिव :-**

महापोर महोदय, प्रश्नोत्तराचा तास आता सुरु करण्यात येत आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

महापौर महोदय, सचिवांकडे आपल्याकडे कोणतीही तहकूबी आलेली नाही कां?

**मा.सचिव :-**

महापौर महोदय, तहकूबी आलेली आहे. महापौर महोदय आजच्या सभेसमोर एक तहकूबी सूचना प्राप्त झाली असुन, त्याचे सूचक आहेत सन्मा.सदस्य श्री.संजय भोईर व अनुमोदक आहेत सन्मा.सदस्य श्री.विक्रांत चव्हाण. तरी पिठासिन अधिकारी यांच्या परवानगीने मी सदरची तहकूबी सूचना वाचत आहे.

( मा.सचिव तहकूबी सूचना वाचुन दाखवितात.)

दिनांक :२०/०१/२०१५

प्रति,
**मा.महापौर सो,**
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

विषय :- **सभा तहकूबीची सूचना.**

**महोदय,**

आज रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये माजी नगरसेविका सौ.शारदा दादु पाटील यांचे निधन झाल्याबद्दल सभा तहकूबीची सूचना मांडत आहे.

माजी नगरसेविका सौ.शारदा दादु पाटील यांचे निधन दि.०१.०१.२०१५ रोजी झाले असुन निधनसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पती दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

सन २००७ साली सौ.शारदा दादु पाटील हया ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२४ मधून निवडून आल्या होत्या. पाच वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी प्रभागातील समस्या दूर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. सामाजिक जाण आणि कार्यकर्त्यांबद्दल असलेली आपुलकी यामुळे त्या प्रभागात लोकप्रिय होत्या.

कै. सौ.शारदा दादु पाटील यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहून माझी ही सभा तहकूबी सूचना मान्य करुन ही सभा पुर्णवेळ तहकूब करण्यात यावी ही विनंती.

सही/-
**सूचक :- श्री.संजय भोईर**

सही/-
**अनुमोदक :-श्री.विक्रांत चव्हाण**

ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

महापौर महोदय, यापुर्वी अशा प्रकारच्या घटना घडलेल्या असताना आपण आपली प्रथा आहे त्याप्रमाणे आपण सभा तहकूब केलेली आहे. कै.शारदा पाटील यांनी वॉर्डासाठी अतिशय चांगल्याप्रकारे काम केले होते. आणि त्याचीच पावती म्हणून त्यांच्या सूनबाई यांना त्यांच्या वॉर्डातील जनतेने महापालिकेत पाठविले आहे तरी माझी विनंती आहे की, आपण आजची सभा तहकूब करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करुया.

**श्री.संजय भोईर :-**

महापौर महोदय, माजी नगरसेविका सौ.शारदा दादू पाटील यांचे दु:खद निधन झाले आहे. सौ.पाटील ज्या प्रभागातुन निवडून आल्या होत्या त्या वॉर्डात त्यांनी पाच वर्षे चांगले कार्य केले. व तेथील सर्व जनतेची त्यांनी मने जिंकली. आणि आता त्या सर्वांना सोडुन गेल्या आहेत तरी माझी या सभागृहाला विनंती आहे की, ज्याप्रमाणे यापुर्वी ज्या-ज्या सन्मा.नगरसेवकांचे दु:खद निधन झाले त्या-त्यावेळी आपण सभा पुर्णवेळ तहकूब केल्या होत्या. तरी आजसुध्दा ही महासभा पुर्णवेळ तहकूब करावी अशी मी विनंती करुन सन्मा.सदस्य श्री.विक्रांत चव्हाण यांनी मांडलेल्या तहकूबीला मी अनुमोदन देत आहे.

**श्री.गिरीष राजे :-**

महापौर महोदय,सन्मा.माजी नगरसेविका श्रीमती शारदा पाटील यांचे दु-खद निधन झाले आहे त्याचे आपल्या संपूर्ण सभागृहालाच दु:ख होत आहे. परंतू मला वाटते की, आपण एक नविन प्रथा पाडुया. श्रीमती शारदा पाटील हया या सभागृहाच्या सन्मा.सदस्या होत्या, तसेच त्या त्यांच्या वॉर्डातील सतत कार्यरत सदस्या होत्या तरी माझे असे म्हणणे आहे की आजची सभा अर्धा तास तहकूब करुन आजचे संपूर्ण कामकाज पुर्ण करुन श्रीमती शारदा पाटील यांना श्रध्दांजली अर्पण करुया अशी माझी आपणास विनंती आहे.

**श्री.योगेश जानकर :-**

महापौर महोदय ही प्रथा पुढच्या वेळेपासुन पाडुया.आजची सभा पुर्णवेळ तहकूब करुया.

**श्री.संतोष वडवले :-**

महापौर महोदय, सन्मा.सदस्य श्री.गिरीष राजे यांनी जी सूचना मांडली आहे त्यास माझे अनुमोदन आहे. तरी आजची सभा ही अर्धा तास तहकूब करण्यात यावी.

**श्री.बालाजी काकडे :-**

महापौर महोदय, शिवसेना पक्षाचे आमदार श्री.बाळा सावंत यांचेसुध्दा दु:खद निधन झाले आहे तरी त्यांनासुध्दा श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री.विक्रांत चव्हाण :-**

महापौर महोदय, शिवसेनेचे माजी आमदार कै.बाळा सावंत यांच्या दु:खद निधनाबद्दल सन्मा.सदस्य यांनी जी सूचना मांडली आहे त्यास मी अनुमोदन देत असुन या दोन्ही दु:खद निधनाबद्दल आजची सभा ही पुर्णवेळ तहकूब करण्यात यावी अशी मी मा.महापौर महोदय आपल्याला विनंती करीत आहे.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्यांनी जी तहकूबी मांडलेली आहे. तरी सभागृहाचा सेन्स लक्षात घेता, सर्व सभागृह या दु:खात सहभागी आहे..,

**मा.विरोधी पक्षनेते :-**

महापौर महोदय मी आपल्याला विनंती करतो की,आपण पक्षनिहाय एका-एका सदस्याला बोलण्यास परवानगी दया. आपण मर्यादा पाळा परंतू ज्यांना बोलायचे असेल त्यांना बोलु दयावे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री.मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, कै.शारदा पाटील हया ज्या बोर्डामध्ये मी होतो त्यावेळी त्या माझ्याबरोबर काम करीत होत्या..,

**मा.महापौर :-**

सन्मा.सदस्य आपण ज्या पध्दतीने म्हणत आहात की आम्हाला बोलायचे आहे परंतू यापुर्वी अनेकवेळा देशातील कर्तबदार मंडळींचेसुध्दा दु:खद निधन झाल्यानंतर आपण तहकूबी मांडली होती ती फक्त तहकूबी मांडली गेली कधीही कोणी चर्चा केलेली नाही. यापध्दतीने जो सभागृहाचा सेन्स आहे, तरी मी सभागृहाला विनंती करतो की, आपण सर्वजण त्या दु:खात सामील आहात आणि म्हणून आपल्या विनंतीनुसार मी आजची सभा अर्धा तास तहकूब करीत आहे. तरी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण करुया.

( सन्मा.माजी सदस्या सौ.शारदा दादू पाटील हयांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात येते.)

ठिक दुपारी १२.५० वाजता सभा अर्ध्या तासाकरीता तहकूब करण्यात येते.

---

**अभिनंदन ठराव**

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक : २१६ दिनांक :२०/२/२०१५

**ठ रा व :-**

कर्नाटक राज्य खो खो असासिएशनच्या माध्यमातून दि. ७ जानेवारी ते ११ जानेवारी २०१५ या कालावधीत बंगळुरु येथे आयोजित करण्यात आलेल्या ४८ व्या सिनियर नॅशनल खो खो स्पर्धा २०१४-२०१५ च्या महाराष्ट्र खो खो महिला संघाच्या व्यवस्थापक पदी ठाणे महापालिकेच्या लिपिक संवर्गातील कर्मचारी व एक ठाणेकर रहिवासी सौ.नीना प्रमोद गोळे हयांची निवड झाल्याबददल ही सर्वसाधारण सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

सौ.नीना गोळे हयांचे क्रिडाक्षेत्रातील योगदान म्हणजेच त्यांना ही प्राप्त झालेली व्यवस्थापक पदाची नियुक्ती आहे आणि विशेष म्हणजे त्यांना हा मान मिळाल्याने निश्चितच ठाणे शहराच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेलेला आहे याचा या सर्वसाधारण सभेस निश्चितच सार्थ अभिमान आहे. तसेच दहा वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सौ.गोळे नीना हयांच्या नेतृतत्वाखाली महाराष्ट्र महिला संघाने खो खो स्पर्धेत विजयी झालेले आहेत हे निश्चितच कौतुकास्पद व अभिनंदनीय असेच आहे.

पुनश्चः एकवार सौ.नीना प्रमोद गोळे, लिपिक, ठाणे महानगरपालिका हयांची ४८ व्या सिनियर नॅशनल खो खो स्पर्धा २०१४-१५ याकरीता महाराष्ट्रातून महाराष्ट्र महिला खो खो संघ व्यवस्थापक पदी नियुक्ती झाल्याबददल ही सर्वसाधारण सभा समस्त ठाणेकरांच्या वतीने अभिनंदन करीत असून भविष्यांतील क्रिडाक्षेत्रातील उपक्रमास हार्दिक शुभेच्छा देत आहे.

तसेच सौ.नीना प्रमोद गोळे लिपिक,दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह ,ठाणे महानगरपालिका हयांचे क्रिडा क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन व प्राप्त पुरस्कार/प्रमाणपत्र लक्षात घेता त्यांना एक वार्षिक वेतनवाढ देण्यात यावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सूचक : श्री.नरेश म्हस्के

अनुमोदकः श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर.

सही/-
(संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

## दु:खवटा ठराव

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २१८. दिनांक २०/१/२०१५.**

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका शारदा पाटील यांचे कोल्हापूरात दिनांक १ जानेवारी २०१५ रोजी हृदयविकाराने निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सन २००७ साली त्या शिवसेनेच्या तिकीटावर ठामपा प्रभाग क्रमांक २४ मधून निवडून आले. या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी प्रभागातील नागरीकांच्या समस्या दूर करण्यांसाठी कसोशीने प्रयत्न केले. सामाजिक जाण आणि कार्यकर्त्यांबददल असलेली आपुलकी यामुळे त्या प्रभागात लोकप्रिय होत्या. उथळसर प्रभाग समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देखील त्यांनी उत्तमरित्या सांभाळली होती.

गरीबांना सहकार्याचा हात देण्यात आणि घरी आलेल्या प्रत्येक पाहुण्यांच्या स्वागतात, सरबराईत त्या कधीच मागे राहिल्या नाहीत. मदतीच्या आशेने घरी आलेल्या याचकाला त्यांनी कधीही रिकाम्या हाताने परत पाठवले नाही. शारदाबाईच्या जीवनाचा पुर्वार्ध अत्यंत कष्टात गेलेला असल्यामुळे "गरीबी" त्यांनी जवळून पाहिली होती. त्यामुळे कुणीही मदतीच्या अपेक्षेने घरी आले की त्यांना ते नेहमीच मदत व सहकार्य करीत असत.

सौ.शारदा पाटील यांच्या कार्याचे समाजाने मुक्तकंठाने कौतुक केले. अगदी समर्थपणे त्यांनी नगरसेविका पदाला न्याय दिला. मतदार संघातील घराघरातून शासकीय सुविधा पुरविल्या. शासनाच्या झ ोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून पवनसुत गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी गोरगरिबांना हक्काची घरे मिळवून देण्यात त्या सक्रीय होत्या. कधी हळव्या तर कधी कठोर होणा-या या माऊलीने संधीचे सोने केले. शासनाच्या झोपडपटटी पुर्नविकास योजनेच्या माध्यमातून पवनसुत गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षा म्हणून गोरगरीबांना हक्काची घरी मिळवून देण्यांत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

शारदा पाटीलांचे माहेर म्हाळेवाडी, परिस्थिती अत्यंत गरीबीची, जनावरे राखण्यापासून शेणी लावण्यापर्यंतची सारी कामे त्यांना करावी लागत. एकदा तर त्यांच्याकडून विहिरीत घागर पडली. त्यावेळी आईच्या भीतीने त्यांनी खोल विहिरीत उतरुन घागर वर काढण्याचं धाडस दाखवले. मोठ्या कष्टाने सातवीपर्यंत शिक्षण घेतलं. दरम्यान डोक्यात जटही आली होती. देवीची जट म्हणून गवगवा सुरु होता पण अंधश्रध्देला मुठमाती देणा-या या भगिनीने कात्रेने जट कापून टाकून क्रांतीचे पहिले पाऊल अत्यंत आत्मविश्वासाने टाकले होते. दरम्यान त्यांचा विवाह १९७२ साली मलतवाडीच्या दादू पाटील यांच्याशी झाला . लग्नानंतर या दांपत्याने पाच-सहा वर्षे मलतवाडीत शेती केली. शेतीवर संसार चालवण कठीण झाल्यामुळे दादू पाटील व सौ.शारदा पाटील हे ठाण्यात आले. दादू पाटील यांनी कोठारी ऑटो पार्टसमध्ये नोकरी केली. पण तुटपुंज्या पगारात संसार चालविणे कठीण झाल्याने सौ.शारदा पाटील यांनी दूध विक्रीचा व्यवसाय सुरु करुन त्यामध्ये त्यांनी लक्ष केंद्रीत केले. पुढे त्यांनी गोकुळसारख्या दुधाची एजन्सी घेऊन **"शारदा दूध सेंटर"** नावाची फर्म स्थापन केली. त्याद्वारे प्रतिदिनी ६० हजार लिटर दुधाची विक्री सुरु करुन १०० कामगारांना रोजगार उपलब्ध करुन दिला. सध्या त्यांची ५०० दूध वितरण उपकेंद्रे आहेत. या व्यवसायातून सुमारे ७०० कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. या व्यवसायाबरोबरच बचत गटाची निर्मिती करुन गोकुळनगरमधील महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यात योगदान दिले. अवघ्या गोकुळनगरात त्या आदर्श माता ठरल्या.

सन १९८६ च्या बेळगावच्या सत्याग्रहातही दादू पाटलांना २० दिवसांचा बल्लारीच्या जेलात तुरुंगवास झ ाला होता. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या सहकार्याने त्यांच्या खांदयांला खांदा लावून काम करुन गोकुळनगर निर्माण करण्यांत त्यांचा व सौ.शारदा पाटील याचा सिंहाचा वाटा आहे. तसेच दिघे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली गोकुळनगर मध्ये शिवसेना शाखा निर्माण करण्यात शारदा पाटील यांचे मोठे योगदान आहे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

सन २००७ च्या निवडणूकीत शारदा पाटील यांना शिवसेनेतून उमेदवारी मिळाली आणि स्थानिक नागरीकांनी त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले व त्या नगरसेविका झाल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ६० बचत गटाच्या महिलांनी त्यांना यशाच्या शिखरावर आरुढ केले. अत्यत समर्थपणे त्यांनी लोकाभिमुख कारभार केला. शारदाबाईच्या कामाच्या पध्दतीमुळे महानगरपालिकेतही त्या कमालीच्या लोकप्रिय ठरल्या. नगरसेविका कार्यकाळात त्यांनी महत्वकांक्षी योजना राबवल्या. पाच वर्षांनंतर त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवला.

सौ.शारदा पाटील यांनी संपूर्ण आयुष्य अतिशय कष्टाने व्यतित केले. पाच वर्षांच्या नगरसेविका कार्यकाळात त्यांनी प्रभागातील समस्या दूर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आणि त्यात त्या यशस्वी सुध्दा झ ाल्या. सामाजिक जाण आणि कार्यकर्त्यांबददल असलेली आपुलकी यामुळे त्या प्रभागात लोकप्रिय होत्या त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली. माजी नगरसेविका शारदा पाटील यांच्या निधनाने राजकीय क्षेत्राचे मोठे नुकसान झाले असून त्यांची उणिव नेहमीच भासत राहणार आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी भावपूर्ण श्रध्दांजली ही सर्वसाधारण सभा अर्पण करीत आहे.

**सुचक :- नरेश गणपत म्हस्के** **अनुमोदक :- हणमंत ज्ञानू जगदाळे**

सही/-
(संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सही/-
(संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**( मनिष जोशी )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

सभा तहकूब झाल्याची वेळ : दुपारी ठिक १२.५० वा.
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे
दिनांक : २०/०१/२०१५ दि. १५-५-२०१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे